आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२२ फेब्रुवारी २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- एआय इम्पॅक्ट समिट हे कृत्रिम बुद्धिमत्तेचा जगभरात उपयोग करण्याच्या दिशेने महत्त्वाचं वळण ठरल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून, सरकारच्या आजच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार

- भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत वॉशिंग्टन इथं होणाऱ्या वाटाघाटींचं वेळापत्रक पुन्हा आखण्याचा दोन्ही देशांचा निर्णय

- टी ट्वेंटी विश्व चषक स्पर्धेत आज भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात लढत /नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा दक्षिण अफ्रिकेचा निर्णय

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये, आशिया चषक रायझिंग स्टार्स २०२६ स्पर्धेचं जेतेपद भारताच्या अ संघानं पटकावलं

<><><><><>

नवी दिल्ली इथं नुकतीच झालेली इंडिया एआय इम्पॅक्ट समिट अर्थात जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभाव शिखर परिषद ही आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग जगभरात कसा केला जाईल, या दिशेनं एक महत्त्वाचं वळण ठरल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १३१ वा भाग होता. या परिषदेत अमूलच्या बूथवरचं प्राण्यांवर उपचार आणि देखरेखीसाठीचं कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपकरण तसंच आपले प्राचीन ग्रंथ, प्राचीन ज्ञान आणि आपल्या हस्तलिखितांच्या जतनासंदर्भातलं ॲप्लिकेशन, या भारताच्या दोन उत्पादनांनी जगभरातल्या नेत्यांना प्रभावित केल्याचं त्यांनी सांगितलं. या शिखर

परिषदेत संपूर्ण जगाला भारताची कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातली अद्भुत क्षमता पाहायला मिळाली, तसंच तरुणांचा उत्साहवर्धक सहभाग पाहायला मिळाल्याचं ते म्हणाले.

देशात अवयवदानाविषयीची जागरूकता सातत्यानं वाढत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

ऑनलाईन फसवणुकीबद्दलही त्यांनी संवाद साधला. डिजिटल अरेस्ट विषयी देशात जागरूकता वाढली असली, तरी आजही अशी प्रकरणं घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर याबाबतीत सगळ्यांनी सतर्क राहण्याचं आवाहन त्यांनी केलं.

आपले शेतकरी केवळ अन्नदाता नाहीत, तर ते आपल्या भूमीचे खरे साधक आहेत असं प्रधानमंत्री म्हणाले. देशातला शेतकरी पारंपरिक पद्धत आणि तंत्रज्ञानाच्या सोबतीनं वाटचाल करतो आहे, असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - MKB MODI SHETKARI**

आगामी रमझान आणि होळीच्या सणात व्होकल फॉर लोकलचा मंत्र जपावा आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्यात हातभार लावावा, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला सत्ताधारी पक्षानं आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला आहे. बहुमतामुळे सत्ताधारी पक्षाचं वर्तन सभ्यपणाचं नाही, जिथं लोकशाहीचा मान राखला जात नाही तिथं आपण चहापानाला जाणार नाही असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी सांगितलं. उद्याच्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी आज मुंबईत आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. भारत - अमेरिका करार हा

पूर्णपणे शेतकरी विरोधी असल्याची टीका जाधव यांनी केली. उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूबाबतही अनेक शंका आहेत, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.

राज्यातली बेरोजगारी, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न, रखडलेले विकास प्रकल्प, शेतमालाला मिळणार अल्प मोबदला या आणि इतर मुद्द्यांवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी टीका केली. माजी मंत्री आदित्य ठाकरे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

मुंबईत आयोजित एआय फॉर ॲग्री या जागतिक परिषदेचं उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. सर्वसमावेशकता, पारदर्शकतेसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करणं हे एआय मिशनचं उद्दिष्ट आहे, याचाच अवलंब कृषी क्षेत्रात करण्याचा सरकारचा प्रयत्न असून कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक एआय धोरण राबवण्याचा निर्णय घेणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. यासाठी सरकारनं महा कृषी एआय ॲग्रीटेक आणि इनोवेशन सेंटरची निर्मिती केली. प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत तंत्रज्ञान पोहोचायला हवं हे सरकारचं उद्दिष्ट आहे. सध्या राज्यातले तीस लाख शेतकरी महाविस्तार ॲपचा वापर करत आहेत, यात आता भिली भाषेचा समावेश केला असून इतर आदिवासी भाषांचाही समावेश केला जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर केल्यास भारताचं कृषी क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत ७० हजार कोटी रुपयांचं योगदान देऊ शकतं, असं प्रतिपादन विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

नागपुरात आयोजित राष्ट्रीय एकात्मता विश्व महासंमेलनात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन  गडकरी यांना संत नामदेव महाराज विश्व पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सर्व संतांनी आपल्या वाङ्मयातून समाजाला अध्यात्मिक मूल्य दिलं असून संत नामदेव महाराजांनी सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला, त्यांच्या विचारांनी अनेकांचं जीवन बदललं, असं प्रतिपादन गडकरी यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत होणाऱ्या वाटाघाटींचं वेळापत्रक पुन्हा आखण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला आहे.

अमेरिकेच्या व्यापार धोरणावरून नुकत्याच झालेल्या घडामोडी आणि त्याचे परिणाम, यांचं दोन्ही देश मूल्यांकन करतील, आणि त्यानंतर भारतीय शिष्टमंडळाची अमेरिका भेट निश्चित केली जाईल, असं वाणिज्य मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेच्या सुपर एट मधे आज अहमदाबाद इथं भारताचा सामना दक्षिण अफ्रिकेशी होत आहे. दक्षिण अफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण अफ्रिकेच्या एका षटकात बिनबाद ४ धावा झाल्या होत्या.

आज पल्लेकेले इथं झालेल्या सामन्यात इंग्लडनं श्रीलंकेवर ५१ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लडनं ९ गडी गमावून १४६ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ १६ षटकं आणि ४ चेंडूतच ९५ धावात गारद झाला.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये भारताच्या अ संघानं बँकॉक इथं झालेल्या आशिया चषक रायझिंग स्टार्स २०२६ स्पर्धेचं जेतेपद पटकावलं. विजेतेपदासाठी आज झालेल्या अंतिम सामन्यात भारतानं बांग्लादेश अ संघावर ४६ धावांनी विजय मिळवला.

या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताच्या अ संघानं निर्धारित २० षटकात ७ बाद १३५ धावा केल्या. तेजल हसबनीसनं नाबाद ५१ धावांची खेळी केली.

विजयासाठी १३६ धावांचा पाठलाग करताना बांगलादेश अ संघाचा डाव १९ व्या षटकात केवळ ८८ धावांतच आटोपला. प्रेमा राव हीनं सर्वाधिक तीन खेळाडूंना बाद केलं.

तेजल हसबनीस हिला सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरवलं गेलं.

<><><><><>

तामिळनाडूमध्ये चेन्नई इथल्या गोल्डन बीचवर काल झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेली युवती भंडारा जिल्ह्यातल्या मोहाडी तालुक्यातली असून, स्थानिक प्रशासनानं तिच्या कुटुंबियांशी संपर्क साधला आहे. चेन्नईमधल्या एका आयटी कंपनीत काम करणाऱ्या, महाराष्ट्रातल्या १५ तरुणांचा गट काल गोल्डन बीच जवळच्या समुद्रात गेला होता. त्यावेळी उसळलेल्या लाटांच्या प्रवाहात ३ जण वाहून गेले. त्यापैकी एका युवकाला बचाव पथकानं सुरक्षितपणे बाहेर काढलं, तर एक जण अद्याप बेपत्ता आहे. बेपत्ता युवक जळगाव जिल्ह्यातला असून, त्याचा शोध सुरु आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात असून, दुर्घटना बाधित कुटुंबांना सर्वतोपरी मदत पुरवली जाईल, असं राज्य सरकारनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

गोंदिया जिल्ह्याच्या सालेकसा तालुक्यातील पिपरिया इथले  लष्कर सुभेदार नेतराम कटरे हिमाचल प्रदेशात कर्तव्य बजावताना शहीद झाले.  त्यांच्या पार्थिवावर आज त्यांच्या मुळ गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहीद कटरे यांना २१ तोफांची सलामी देण्यात आली. परिसरातले हजारो नागरिक यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात उल्लेखनीय वाढ झाली.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात हवामान कोरडं राहील.

**//<><><><><>//**